# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे

एम्.ए., पीएच् डी.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२६–२७/४४ दि. १९/०५/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : दिनांक १० जुन २०२६ रोजी, जागतिक नेत्रदान दिवस निमित्त मरणोत्तर नेत्रदान जनजागृती व नेत्र तपासणी मोहिम आयोजित करणेबाबत..

संदर्भ : मा. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक:रासेयो–२०२६/प्र.क्र.४३/रासेयो कक्ष, दि. १८ मे,२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

मा. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रानुसार राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दि. १० जून २०२६ रोजी जागतिक नेत्रदान दिवस निमित्त नेत्र चिकित्सा शिबिर (Eye Checkup Camp) व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती (Eye Donation Campaign) मोहिम या विषयांवर उपक्रम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने आपल्या महाविद्यालयामध्ये दि. १० जून २०२६ रोजी जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागातून पुढीलप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

१.प्रसिध्द नेत्रतज्ञ/रूग्णालयांच्या सहकार्याने नेत्रदान जनजागृती अभियानार्गत मोफत नेत्र तपासणी शिबिर घेण्यात यावे.

२.नेत्रदान शपथ व नोंदणी मोहिम (Eye Donation Pledge Drive) आणि विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये नेत्रदानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करावे.

३.सदर उपक्रमांना सोशल मिडियाच्या माध्यमातून व्यापक प्रसार व जनजागृती करावी.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहभागातून सदर उपक्रम राबविण्यात यावेत. सदर उपक्रमाचे My Bharat पोर्टलवर Event Create करून माहिती अपलोड करण्यात यावी. तसेच याबाबतचा अहवाल BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव "जागतिक नेत्रदान दिवस–२०२६" या विषयाची निवड करून सादर करण्यात यावा. सदर कार्यक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत: मा. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५


---

**क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र.४३/रासेयो कक्ष** **दिनांक: १८ मे, २०२६**

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
रासेयो संलग्नित,
सर्व विद्यापीठे/ संचालनालये

**विषय:- दिनांक १० जुन , २०२६ रोजी जागतिक नेत्रदान दिवस निमित्त मरणोत्तर नेत्रदान जनजागृती व नेत्र तपासणी मोहिम आयोजित करणे बाबत.....**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दिनांक १० जुन, २०२६ रोजी जागतिक नेत्रदान दिवस निमित्त संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नेत्र चिकित्सा शिबिर (Eye Checkup Camp) व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती (Eye Donation Campaign) मोहिम या महत्त्वाच्या विषयांवर उपक्रम राबविण्याचे योजिले आहे. यानुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या विद्यमाने संचालक, राज्यातील सर्व कृषि व अकृषि विद्यापीठे/संचालनालयाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये दिनांक १० जुन, २०२६ रोजी नेत्र चिकित्सा शिबिर (Eye Checkup Camp) व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती (Eye Donation Campaign) मोहिम आयोजित करण्याबाबत आपल्या स्तरावरून सर्व विद्यापीठ व विद्यापीठातर्गत महाविद्यालयांना सूचित करावे. त्या अनुषंगाने, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत आपल्या विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये खालीलप्रमाणे उपक्रम आयोजित करावेत, ही विनंती.

1. **नेत्रदान जनजागृती अभियानातर्गंत मोफत नेत्र तपासणी शिबिर (प्रसिद्ध नेत्रतज्ञ / रुग्णालयांच्या सहकार्याने)**
2. **नेत्रदान नोंदणी मोहिम (Eye Donation Pledge Drive) तसेच विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये नेत्रदानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन.**
3. **सोशल मीडियाद्वारे व्यापक प्रसार व जनजागृती.**

सदर दिनांक १० जुन, २०२६ रोजी जास्तीत-जास्त विद्यार्थी व जनमाणसांचा या उपक्रमात/जनजागृती अभियानात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत आपले विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयां मार्फत सहभाग वाढविण्यात यावा. सदर उपक्रम कालावधी मध्ये नेत्ररोगतज्ञांचे नेत्रदाना संबधी व्याख्यान आयोजित करुन विद्यार्थ्यांमध्ये / कर्मचा-यांमध्ये पुरेशी जनजागृती करावी व प्रत्यक्ष नेत्रदानाचे फॉर्म भरुन घेण्यात यावेत.

**(डॉ. मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

**प्रत- माहिती व योग्य त्याकार्यवाहीस्तव सादर.**

१. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२. मा.अपर मुख्य सचिव (उ. व तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप सचिव(समन्वय) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
४. रासेयो क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे.
५. निवड नस्ती रासेयो कक्ष